**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, NOV-DEC 2017, VOL- 4/37*

# कुटुंब जीवन शिक्षणाचे विवाह आणि वैवाहिक जीवनातील महत्त्व: एक अभ्यास

**प्रा. सुनिता काशिनाथ जगताप**
***म. वि. प्रसमाजाचे, समाजकार्य महाविद्यालय, नाशिक.***

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:**

कुटुंब जीवन चक्राच्या प्रत्येक अवस्थेत प्रत्येक व्यक्ती जात असतो. प्रत्येक अवस्थेतून जाताना नात्यात कठीणत्व व येत जाते. जे शारीरिक मानसिक भावनिक बदलावर परिणाम कारक असते. सुखद व त्रासदायक अशा संमिश्र स्वरूपाचीची अवस्था म्हणजे युवा अवस्था होईल या कालखंडात व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यात दुसऱ्या व्यक्तीचा प्रवेश होतो व समाज मान्यता प्राप्त करून म्हणजेच विधिवत विवाहाद्वारे नवीन जीवनाला सुरुवात करतात. हा कालखंड सुखकारक असावा म्हणून विवाहवाह आणि वैवाहिक जीवनात कुटुंब जीवन शिक्षणाचे महत्त्व काही वेगळेच आहे.

**विषयाचे महत्व:**

विवाह आणि वैवाहिक जीवनात अनेक चढ-उतार असतात नवविवाहीत जोडपे- समायोजन, प्रेम, आपुलकी, भावनिकबदल, कुटुंबनियोजन, कौटुंबिक व आर्थिक स्थैर्य इत्यादी परिस्थितीतून जात असते. अशावेळी पती-पत्नी, कुटुंब सदस्य, बालक -पालक संबंध, मतभेद, तान-तनाव, संघर्ष निर्माण होतात याचा सामना करण्यासाठी व्यक्तीला कुटुंबजीवन शिक्षणाची गरज असते.

**अध्ययन विषयाची व्याप्ती:**

सदर विषयात विवाह आणि वैवाहिक जीवनातील कुटुंबजीवन शिक्षण या विषयाबद्दल अध्ययन केले आहे

**अध्ययन विषयाचा उद्देश:**

१] कुटुंब जीवन शिक्षण संकल्पना अभ्यासणे.
२] विवाह आणि वैवाहिक जीवनातील जबाबदारी अभ्यासणे
३] वैवाहिक जीवन सुखकारक होण्यासाठी कोणते प्रयत्न केले जावेत हे अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत अध्यनपूर्णपणे दुय्यम तथ्यावर आधारित असून यासाठी पुस्तके, इंटरनेट, मासिके, लेखांचा आधार घेतला असून संकलित केलेल्या माहितीचे अध्ययन करून वर्णनात्मक पद्धतीने मांडणी केली आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**विवाहाची संकल्पना :-**

**भारतीय संस्कृतीत विवाह हे एक पवित्रबंधन मानले जाते. ते जन्माचे नाते असते. त्यामुळे ते सहजासहसी तोडता येत नाही. याउलट, पाश्चात्य देशात विवाह हा 'करार' म्हणून मानला जातो. त्यामुळे एकमेकांचे न पटल्यास ते दोघेही करार मोडू शकतात. विवाहाचे बंधन हे वैवाहिक स्थैर्यावर व संतुलनावर अवलंबून असते. जर या बंधनात अस्थैर्य व असंतुलन आले तर वैवाहिक विघटन प्रक्रिया सुरु होते. हे विघटन थांबविण्यासाठी वैवाहिक संबंध सुधारावे लागतात व त्यात पुन्हा समायोजन घडवून आणावे लागते. हे शक्य न झाल्यास त्याची परिणती घटस्फोटात होते.**

**वैवाहिक समायोजन करत असताना बरेचसे अडथळे देखील येऊ शकतात. पती-पत्नीची वैवाहिक भूमिका, सदोष आंतरव्यक्तिक संवाद, सासू-सास-यांचे विशिष्ट प्रकारे वागणे यामुळे वैवाहिक अडथळे निर्माण होऊ शकतात. चांगले वैवाहिक संबंध, कौटुंबिक अस्मिता, एकात्मता, स्थिरता, सामंजस्य आणि चांगले मानसिक आरोग्ययाकरिता कारणीभूत ठरते. पतीपत्नीची बुद्धीमता, भावनाशीलता, अहंभाव, जीवनशैली, काही मुलभूत सवयी व अभिवृत्ती याबाबत केलेले समायोजन हे दोघांनाही आंनददायी व सुखकारक ठरते. याउलट पतिपत्नींची, लहानपणापासूनची बनलेली मते, अज्ञानाने किंवा चुकीने बनलेली मते, अहंभाव, स्वप्रतिमा, इत्यादी घटकांमुळे समस्यांचा उगम होतो. या समस्यांचा उगम दांपत्यांमधील प्रमुख पाच संबंधावर अवलंबून असतो. शारीरिक व भाविनक, सामाजिक, बौध्दिक आणि आध्यात्मिक**

**वैवाहिक समुपदेशनाची गरज :-**

**Ø स्वत:च्या गुणदोषांची माहिती होण्यासाठी**

**Ø जोडीदाराच्या विषयीच्या अपेक्षांना निश्चित स्वरुप देण्यासाठी**

**Ø वैवाहिक जीवनाची पूर्ण जबाबदारीची पूर्व तयारी करण्यासाठी**

**Ø विवाहाच्या निर्णया समदत होण्यासाठी मानसिक तयारी होण्यासाठी**

**Ø वैवाहिक जीवनाबद्दलच्या वेगवेगळ्या भिती घालवण्यासाठी.**

**जोडीदाराबद्दलच्या अपेक्षा व निवडीची मार्गदर्शक तत्वे:-**

**प्राचीनकाळी जोडीदाराविषयीच्या अपेक्षांना फारसा वाव नव्हता. घरातील अनुभवी व्यक्ति लग्न ठरवित असत. जसाजसा काळ बदलला, शिक्षणाचा प्रसार झाला व्यक्तिस्वातंत्र्याचे वारे वाहू लागले आणि ज्या स्त्री किंवा पुरुषास विवाह करावयाचा आहे. त्यांच्या पसंतीचाही विचार होऊ लागला आणि आता तर अनेक युवकयुवती घरातील व्यक्तिंना विश्वासात न घेताच आपले विवाह ठरवितात.**

**प्रत्येकाच्या आपल्या जोडीदाराबद्दलच्या काही अपेक्षा असतात. त्या जर वास्तव असतील तर योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता जास्त असते. मात्र अवास्तव अपेक्षामुळे नैराश्य येऊ शकते. अनेकांना असे वाटते आपल्याकडे भरपूर दूध देणारी, आखुड शिंगी व कमी चारा खाणारी गायअ सावी. अर्थातच अपेक्षापूर्ती न झाल्यामुळे वैवाहिक समायोजनात अडथळे येतात. शिवाय काही वेळा आपल्या जोडीदाराची तुलना दुस-व्यक्ति बरोबर केल्याने ही नैराश्य येते. साधारणपणे या अपेक्षा पुढीलप्रमाणे असतात.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

१]आर्थिक अपेक्षा - जोडीदाराने नोकरी करावी का?

जोडीदाराचे वेतन किती असायला हवे?

जोडीदाराच्या घरची आर्थिक परिस्थिती

नोकरी / व्यवसाय समान असावा की नाही?

२]दिसण्याबद्दलच्या अपेक्षा -

रंग (गोरा, सावळा इ)

उंची (वधूची उंची शक्यतो कमी)

बांधा (वधू जाड नसावी, अनुरुप असावी)

केस (आखुड, लांब. इ)

सौंदर्य (सापेक्ष कल्पना )

व्यंगनको (डोळ्यात तिरपेपणा इ.)

३]वागण्याबद्दल अपेक्षा - (स्वभाव)

- हसतमुख
- मनमिळाऊ
- गंभीर
- बोलकेपणाइ.

४]लग्नपत्रिका – जुळली पाहिजे.

आपले आयुष्य सुखीकरण्याच्या दृष्टीने जोडीदाराची निवड करावयाची असल्यास काही तत्वांचा अवलंब करणे उपयुक्त ठरते. ही तत्वे मानसशास्त्र व समाजशास्त्रयांच्या संशोधनातून उपलब्ध झाली आहेत.

प्राथमिक विचार– मुल गाव मुलगी कोणत्या कुटुंबातील आहेत याचा सर्व प्रथम विचार केला पाहिजे. आईवडिलांचे वैवाहिक जीवन सुखकारक व चांगले असेल तर त्यांच्या मुलांचे वैवाहिक जीवन देखील सुखकारक ठरते. ही एक सर्वसाधारण आढळून येणारी वस्तुस्थिती आहे. याउलट आई-वडिलांचे वैवाहिक जीवन सुखकारक नसेल तर त्याचा मुलांच्या वैवाहिक जीवनावर परिणाम होतो. अर्थात काही मुलं याला अपवाद असतात. ती आईवडिलांचे दुःखदायक वैवाहिक जीवन विसरुन स्वतःच्या वैवाहिक जीवनाकडे लक्ष देतात, स्वतःचे वैवाहिक जीवन चांगले कसे होईल हे पाहतात.

आपला जोडीदार कोणत्या कुटुंबातील आहे. याचा आपण निश्चयपूर्वक विचार केला पाहिजे. जोडीदाराच्या कुटुंबाचा दर्जा, त्यांची आर्थिक परिस्थिती, त्यांची जीवनमूल्ये, कौटुंबिक स्थिरता व कौटुंबिक संस्कृती इ. घटकांकडे लक्ष देणे आवश्यक ठरते.

अ] वैवाहिक जीवनाची जबाबदारी

१]पूर्वीची परिस्थिती व जीवनपद्धती

पुर्वी भारतात एकत्र कुटुंब पद्धती होती. त्यात स्त्री-पुरुषांच्या जबाबदा-या निश्चित होत्या. शिवाय जीवन ही फारसे वेगवान व गुंतागुंतीचे नव्हते. स्त्रियांनी चूल व मूल (म्हणजे थोडक्यात घर) सांभाळावे व

पुरुषांनी अर्थार्जन व घराबाहेरील व्यवहार करावे असा अलिखित संकेत होता. घरात जेष्ठ पुरुषाचे वर्चस्व असे, इतरांना फारसे मत स्वातंत्र्य नव्हते. विवाह म्हणजे दोनभिन्न लिंगी व्यक्तींना केवळ प्रजोत्पादनासाठी काम जीवनाला दिलेली कायदेशीर व सामाजीक संमती एवढाच अर्थ होता. लहान वयातच विवाह होई. विवाह कर्ते पुरुषच ठरवित. नवविवाहीतांना सुरुवातीला कुटुंबाची जबाबदारी घ्यावी लागत नसे.

Ø आजची बदलती परिस्थिती.

वेगवान, आधुनिक जीवनशैली, अर्थार्जनास अवास्तव महत्त्व, व्यक्ती स्वांतत्र्याचा प्रसार यामुळे आज, विभक्त कुटुंब पध्दती रुढ झाली आहे. विशेषत: शहरात विभक्त कुटुंबपद्धती मोठ्या प्रमाणात स्थिरावली आहे. स्त्रियापुरुषांच्याबरोबरीनेअर्थार्जनासाठीबाहेरपडूलागल्याआहेत. वाढतीमहागाई, खर्च, उच्च राहणीमानाचे आकर्षण यामूळे स्त्रि व पुरुष दोघांनाही अर्थार्जन करणे भाग पडत आहे. शिक्षणाचा व स्त्री शिक्षणाचा प्रसार वाढल्याने विवाहाचे वय वाढले आहे. काही व्यक्ती तर आर्थिकदृष्ट्या स्थापित झाल्याशिवाय विवाह करीत नाहीत. विवाह हा केवळ प्रजोत्पादनासाठी ही कल्पनाही मागे पडत आहे. 'काम जीवन नैसर्गिक जीवनाला आवश्यक आहे.' अशी कल्पना समाजात रुजत आहे.

Ø युवकांच्या मनातील शंका, भिती

भारतीय समाजात विवाह, लैंगिक आरोग्य या विषयांवर मोकळेपणाने चर्चा होत नाही. त्यामुळे तारुण्य सुलभ उत्साहाने युवक अशा स्त्रीय माहितीचा बळी ठरतो. विवाहा अगोदर त्यास अनेक शंका असतात. विवाहामूळे येणा-या जबाबदा-या आपण पेलू शकू का? आर्थिक समस्या सोडवू शकू का? आपली सहचारी कशी असेल? तीचे विचार व स्वभाव आपल्या घरच्या लोकांशी जुळतील का? अशा शंका असतात. युवतींना आपला पती आपल्याला समजून घेईल का? नवीन घरातील व्यक्तींचा स्वभाव कसा असेल? अपत्य संगोपनाची जबाबदारी आपणास पेलवेल का? पतीच्या इच्छा-आकाक्षांचीपूर्ती आपल्याकडून होईल का? आपली नोकरी, व्यवसाय, शिक्षण विवाहानंतर चालू ठेवता येईल का? अशा शंका असतात.

२] बदलत्या परीस्थितीत कौटुंबीक जबाबदा-या

Ø स्त्री जर लग्नाअगोदर नोकरी करीत असेल व लग्नानंतर ही अर्थार्जनासाठी तीला नोकरी करावी लागणार असेल तर घराची, मूलांची व नोकरीच्या ठिकाणची अशा सर्व जबाबदा-या पार पाडतांना तिच्यावर शारीरिक व मानसिक ताण येऊ शकतो.

Ø विभक्त कुटुंबात मूलांना सांभाळणे अत्यंत अवघड असते. त्यांच्या शाळेच्या, क्लासेसच्या वेळा, खाण्याच्या वेळा यांचा मेळ आपल्या नोकरी, व्यवसायाशी लावणे अवघड जाते.

Ø कुटुंब नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. नोकरीच्या सुरुवातीच्या काळात मूल झाले तर नोकरीवर परीणाम होऊ शकतो. मूल केव्हा होऊ द्यावे, त्याचे नियोजन कसे करावे, आपल्या अपत्यांची संख्या किती असावी हे सर्व विचारपूर्वक ठरवावे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

Ø **जर स्त्री अर्थाजन करीत नसेल तर काही वेळा पुरुष एकापेक्षा अधिक नोक-या करणे**, ( Part time job), **ओव्हरटाईम करणे अशा मार्गाने अधिक पैसे मिळविण्याचा प्रयत्न करतो. त्यामूळे घराकडे दुर्लक्ष होऊ शकते. त्यातून वैवाहिक ताण-ताणाव निर्माण होतात.**

Ø **स्त्री/पुरुष अर्थार्जन करतांना तीच्या त्याच्या नोकरीच्या स्वरुपामुळे अधिक शारिरीक व मानसिक श्रमामुळे थकतो. अशावेळी तो आपल्या जोडीदाराच्या लैंगिक अपेक्षा पूर्ण करु शकत नाही. अशावेळी जोडीदाराला समजून घेणे महत्त्वाचे आहे.**

Ø **स्त्रीनोकरी निमित्त घराबाहेर पडल्याने पुरुषाला घरातील काही जबाबदा-या घ्याव्या लागतात. त्यात स्वयंपाक, मूलांचे संगोपन या महत्त्वाच्या बाबी येतात. नाते वाईक, मित्र, समाज यांच्या विविध सामाजिक कार्यात सहभागी होणे. कुटुंबातील इतर व्यक्तीच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांचे ताणतणाव कमी करण्यास मदत करणे.**

**३**]SWOT **लग्न संबंधी**

**जोडीदार निवडताना, स्वत:ला अनुरुप असा जोडीदार निवडल्यास समायोजन अधिक सोपे होते व विवाहातून दोन्ही जोडीदारांना आनंद मिळू शकतो. परंतु अनुरुप जोडीदार निवडण्यासाठी प्रथम आपण स्वत: कसे आहोत व विवाहाला अनुसरुन आपल्यात काय बदल घडवणे आवश्यक आहे. हे समजण्यासाठी** Swot **विश्लषण उपयुक्त ठरते. त्यासाठी** Swot **च्या चार घटकांशी संबंधित पुढील प्रश्न उपयुक्त ठरतील.**

Ø **बल स्थाने** (Strengths) –

- **तुमची स्वयंपूर्ण ताव जोडीदाराची जबाबदारी स्वीकारण्याची क्षमता काय आहे?**
- **तुमची कोणती स्वभाव वैशिष्ट्ये इतरांना आवडतात?**
- **तुमच्या कोणत्या गुणांमुळे इतरांना तुमचा सहवास हवाहवासा वाटतो?**
- **तुमची कोणती तत्वं विवाहास पूरक ठरतील?**
- What is your structural support?

Ø **कमतरता** Weaknesses

- **तुमची कोणती स्वभाव वैशिष्ट्ये इतरांना त्रासदायक वाटतात?**
- **तुमच्या कोणत्या तत्वांमुळे समायोजनात अडथळे निर्माण होऊ शकतात?**
- **तुमच्या** Structural support **मध्ये काय कमतरता आहेत?**

Ø **संधी** Opportunities

- **तुमचा** Structural support **तुम्ही कसा वाढवू शकाल?**
- **ह्या संदर्भात तुम्हाला कोण मार्गदर्शन करु शकेल?**
- **तुमच्या कोणत्या अपवादात्मक गुणामुळे तुम्ही अधिक हवेसे वाटाल?**

Ø **आव्हाने** Challenges

- **तुमच्यातील समायोजनास अवघड अशा स्वभाव वैशिष्ट्यात बदल करणे.**

- Structural Support मधील कमरता भरुन काढण्यासाठी वर्तवणूकीत बदल करणे.

**४] लैगिंक आरोग्य**

**Ø विवाहपूर्व प्रणयातील डोळसपणा –**

भारतामध्ये बहुतेक आई वडिल मुलांचा विवाह ठरवितात. बदलत्या काळानुसार काही मुले स्वतःच विवाह ठरवितात. या दोन्ही प्रकारांमध्ये प्राथमिक विचार करावाच लागतो. परंतु मुलांनी स्वतःचा विवाह ठरविल्यास (प्रेमविवाह) त्यांना स्वतःच परस्परांच्या अनेक व्यक्तिगत गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते. प्रणयाराधन होत असताना परस्परांचे खाजगी जीवन कसे आहे, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**Ø वैवाहिक जीवनात लैंगिकता**

हा एक भाग असतो. लैगिंक जीवनाचा उपभोग म्हणजे वैवाहिक जीवन नव्हे. प्रेमविवाह करणाच्या काही मुला-मुलींचे विवाहापूर्वी लैगिंक संबंध येतात. पाश्चिमात्य संस्कृतीत विवाहपूर्व लैंगिक संबंधात मुभा असल्या कारणाने लैगिंक संबंध आल्यानंतरसुध्दा दोघांनी विवाह केला नाही तर काही बिघडत नाही. परंतू आपल्या देशात विवाहपूर्व लैगिंक संबंधानंतर दोघांनपैकी एकाने विवाहास नाकार दिला तर दुस-याची निराशा व फसगत होते. त्यामुळे विवाहापूर्वी दोघांनिही सावधगिरीने, डोळसपणाने परस्परांवर प्रेम केले पाहिजे. विवाह हे ध्येय ठेवून टप्याटप्याने दोघांनी परस्परांच्या जवळ येणे हे दोघांच्यादृष्टीने हितकारक व फलदायी ठरते.

ओळख, मैत्री, परस्पर दृढता, जवळीकता, वा निश्चय व विवाह हा क्रम दोघांच्या दृष्टीने सुरक्षित ठरतो.

**Ø भावनिक आणि सामाजिक परिपक्वता :-**

जी मुले-मुली भावनिक दृष्ट्या स्वतःच्या आईवडिलांवर अवलंबून न राहता स्वतःचे प्रश्न वस्तुनिष्ठेतूनच सोडवितात ते अधिक सुखी होतात. त्याचप्रमाणे समृध्द वैवाहिक जीवनाकरिता जोडीदाराबरोबर योग्य असे भावनिक व सामाजिक संबंध प्रस्थापित करणे अधिक श्रेयस्कर असते. विशिष्ट प्रसंगी जोडीदाराला समजावून घेणे, त्याच्या अडचणीत सहानुभूती दाखविणे, भावनिक आत्मीयता प्रस्थापित करणे हे सुखी जीवनाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असते.

**५] व्यक्तिगत वैशिष्ट्ये**

व्यक्तिभेद स्वाभविक असले तरी दोघांच्या स्वभाव –वैशिष्ट्यांतील अंतर कमी करणे हे दोघांच्याही हातात असते आणि दोघांच्याही हिताचे असते. दोघांपैकी एखाद्या भांडखोर आणि आक्रस्ताळी असेल तर वैवाहिक समायोजन हे एकतर्फी होईल. सामंजस, आशावादी, मनमिळाऊ, शांतपण स्थिर चित्त, इत्यादी स्वभाव-वैशिष्ट्ये दोघांचीही असल्यास ते परस्परांना पूरक ठरतात.

**Ø जीवनमूल्ये व अभिरुची–**

प्रत्येकाच्या जीवनात फावला वेळ मिळतो. हा फावळा वेळ व्यक्ती कशाप्रकारे व्यतीत करते याला फार महत्त्व आहे. अभिरुची व जीवनमूल्ये भिन्न-भिन्न असणे याचा अर्थ दोघांच्याही आचरांची व विचारांची दिशाभिन्न आहे असा होतो. याच भिन्नतेत दोघांमधील कुरबुरीचे मतभेदांचे मूळ असते.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

Ø **सुखी जीवनाची जिद्द–**

**'माझे वैवाहिक जीवन' असा विचार मनात न ठेवता 'आमचे वैवाहिक जीवन' हा विचार सतत डोळ्यांसमोर आला पाहिजे. वैवाहिक जीवन सुखी करण्यापेक्षा मी काय करु शकतो' 'मला काय करावयास हवे' हा विचार जोडीतील प्रत्येकाच्या मनात आला तर ती सुखी वैवाहिक जीवनाची पहिली पायरी ठरेल. एकंदरीत 'यशस्वी वैवाहिक जीवन' हे प्रत्येक विवाहित व्यक्तिचे ध्येय असेल तरच ती व्यक्ति या दृष्टीने वाटचाल करु शकते.**

**सारांश**

**"कुटुंब जीवन शिक्षण" हि व्यापक संकल्पना आहे. व्यक्तीला प्रत्येक अवस्थेमध्ये वेगवेगळे कुटुंबजीवन शिक्षण दिले जाते. प्रत्येक अवस्थेमध्ये वेगेगले कुटुंबजीवन शिक्षण दिले जाते. प्रत्येक गोष्ठ हि कुटुंबजीवन शिक्षणात येते असते. प्रत्येक गोष्ठ हि कुटुंबजीवन शिक्षणात येत असते. कुटुंबजीवन शिक्षणामध्ये प्रामुख्याने लैंगिक शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, जीवनकौशल्य शिक्षण इ. बाबींचा समावेश होतो. कुटुंबजीवन शिक्षण हे आपल्या दैनदिन जीवनात किती महत्वाचे आहे हे कळून येते. कुटुंब जीवन शिक्षणामध्ये विवाहपूर्व मार्गदर्शन, विवाहोत्तर मार्गदर्शन, लैंगिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, मानसिक आरोग्य शिक्षण याचा समावेश होतो, कुटुंब जीवन शिक्षणात मुली शिक्षण हा महत्वाचा भाग आहे. व्यक्ती कुटुंबजीवन शिक्षण घेताना काय चांगले व काय वाईट यामधील फरक करण्यास शिकते. जे मुळे संस्थामध्ये राहतात अशा मुलांचे संस्था हेच कुटुंब असते. अशा संस्थामध्ये कुटुंबजीवन शिक्षण दिले जाते. दैनदिन जीवनातील बरेचसे धोके टाळण्यासाठी कुटुंबजीवन शिक्षण महत्वाचे असते. कुटुंबजीवन शिक्षणाचा वापर जीवनात पेत्याक्ष करायचा नाही हा व्यक्तीवर अवलंबून आहे. थोडक्यात व व्यक्तीनिष्ठ असते ज्या व्यक्ती कुटुंब जीवन शिक्षणाचा उपयोग स्वतःच्या जीवनात करट असतात त्यांच्या जीवनातील बरेचसे जीवनाश्यक धोके टाळू शकतात.**

**संदर्भसूची**

***गवळी मिनाक्षी– व्यक्तिमत्व विकास, म. वि. प्र. समाज, नाशिक. प्रथम आवृत्ती डिसेंबर२०१३, प्रकाशन नाशिक,***

***कुंदे; प्रतिभा. "कुटुंबजीवन शिक्षण", म. वि. प्र. समाज, नाशिक. प्रथम आवृत्ती डिसेंबर२०१३, प्रकाशन नाशिक,***

*https://www.ncfr.org*

*https://en.m.wikipedoa.org*

*https://www.encyclopedia.com*